आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

५ सप्टेंबर २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- शिक्षक आणि पालकांनी मुलांना नेहमी महिलांचा आदर करण्याची शिकवण द्यावी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं देशभरातल्या शिक्षकांना आवाहन, राज्यातल्या ५ शिक्षकांचा गौरव

- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते राज्यातल्या १०९ शिक्षकांचा गौरव

- राज्यात आतापर्यंत सरासरीच्या १२१ टक्के पाऊस, १०२ टक्के क्षेत्रावर पेरण्या पूर्ण

- २९ हजार रोजगार निर्माण करणाऱ्या ४ औद्योगिक प्रकल्पांना मुख्यमंत्र्यांची मंजुरी

**आणि**

- महाविकास आघाडी राज्यात मजबूत असल्याचं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचं स्पष्टीकरण

<><><><><>

शिक्षक आणि पालकांनी मुलांना नेहमी महिलांचा आदर करण्याची शिकवण दिली पाहिजे, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं.

**होल्ड बाईट**

शिक्षक दिनानिमित्त नवी दिल्लीच्या विज्ञान भवन इथं देशभरातल्या ८२ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांचं वितरण आज राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. त्यावेळी त्या

बोलत होत्या. नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्य विकासावर अधिक भर देण्यात आला असून त्यामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होतो, असं सांगताना राष्ट्रपतींनी शिक्षण क्षेत्र सर्वसमावेशक केल्याबद्दल शिक्षकांचं कौतुक केलं.

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातल्या चार शिक्षकांचाही समावेश आहे. यात जाजावंडीच्या पुपीर प्राथमिक डीजिटल शाळेच्या शिक्षक मंतैया चिन्नी बेडके, कोल्हापूरच्या एसओयू लोहिया शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सागर बागडे यांचाही राष्ट्रपतींनी गौरव केला. याविषयी ते म्हणाले

**होल्ड - सागर बागडे (३१ सेकंद)**

पुण्याच्या प्राध्यापक रामकृष्ण मोरे महाविद्यालयाच्या इंग्रजीच्या प्राध्यापिका शिल्पागौरी गणपुले, भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेच्या रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक श्रीनिवास होथा आणि आयटीआय प्राध्यापक विवेक चांदलिया यांचा समावेश आहे.

<><><><><>

विद्यार्थ्यांना आयुष्याची दिशा दाखवण्यात शिक्षकांचं समर्पण, मार्गदर्शन आणि योगदान महत्त्वाचं असून त्यांच्यात जग बदलण्याची ताकद आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज काढले. क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार विजेत्या शिक्षकांना आज मुंबईत मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमात १०९ शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. यामध्ये प्राथमिक विभागातले ३८ शिक्षक, माध्यमिक विभागातले ३९ शिक्षक, आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे १६ शिक्षक, कला आणि क्रीडा क्षेत्रातले २ विशेष शिक्षक, दिव्यांग किंवा दिव्यांग विद्यार्थ्यांच्या

शाळेतले एक आणि स्काऊट गाईड मधले दोन तसंच ८ शिक्षिकांना आदर्श शिक्षिका पुरस्कार देण्यात आले. राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारप्राप्त शिक्षकांपैकी बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या शाळांमध्ये शिकवणाऱ्या ६ शिक्षकांचा पालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महापालिकेच्या मुख्यालयात हा सत्कार सोहळा झाला. शिक्षक दिनानिमित्त आयआटी मुंबई इथं अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्र तसंच अध्यापन कौशल्य आणि संशोधनासाठी विविध प्राध्यापकांना पुरस्कारांनी गौरवण्यात आलं. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू आणि निवृत्त लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आलं.

<><><><><>

यंदा राज्यात १२१ टक्के पाऊस झाला आहे. तसंच राज्यात १०२ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. राज्यात २०१८ नंतर पहिल्यांदाच मोठी धरणं शंभर टक्के भरली असल्याची माहिती आज मंत्रीमंडळ बैठकीत देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत ही बैठक झाली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत सुमारे १ कोटी ६० लाख लाभार्थ्यांना ४ हजार ७८७ कोटी रुपयांचं वाटप करण्यात आल्याचंही या बैठकीत सांगण्यात आलं. या योजनेमुळं राज्यातल्या ३६ हजारांपेक्षा जास्त अंगणवाडी केंद्रांना सौर ऊर्जा संच देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. थकबाकी देणाऱ्या कुक्कुटपालन संस्थांना दंडनीय व्याजाची रक्कम माफ करण्याचा निर्णयही घेण्यात आला. कोकणातल्या अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळवण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती जलसंपदा विभागानं आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिली. पुणे -

शिरूर - अहमदनगर - छत्रपती संभाजी नगर राष्ट्रीय महामार्गावरील पुणे ते शिरूर या ५३ किलोमीटर मार्ग उन्नत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

<><><><><>

राज्यात १ लाख १७ हजार २२० कोटी रुपये गुंतवणुकीच्या, उच्च तंत्रज्ञानावर आधारित ४ विशाल प्रकल्पांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मान्यता दिली. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय झाला. या प्रकल्पांमुळे सुमारे २९ हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

सेमीकंडक्टर निर्मितीचा प्रकल्प पनवेलमध्ये होणार आहे. एकूण ८३ हजार ९४७ कोटी रुपये गुंतवणुकीच्या या प्रकल्पामुळे १५ हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

पुण्यातल्या इलेक्ट्रीक वाहन निर्मिती प्रकल्पात एकूण १२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून एक हजार रोजगार निर्माण होतील. छत्रपती संभाजीनगर इथं २१ हजार २७३ कोटी रुपये गुंतवणुकीच्या वाहन प्रकल्पातून १२ हजार रोजगार निर्माण होतील. अमरावती जिल्ह्यात नांदगाव इथं वस्त्रोद्योगात १८८ कोटी एवढी गुंतवणूक आणि ५५० रोजगार निर्मिती होणार आहे.

<><><><><>

एसटी महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसगाड्यांमध्ये दिव्यांग प्रवाशांना आरक्षित आसन यापुढं कायमस्वरूपी दिलं आहे. ते कोणत्याही थांब्यावरून बसमधे आले तर त्यांना त्यांचं आरक्षित आसन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित वाहकाची असणार आहे.

<><><><><>

तालुकास्तरावरच्या ३०४ कामगार सुविधा केंद्रांचं उद्घाटन आज मुंबईत झालं. या सेतु केंद्राद्वारे बांधकाम कामगारांची नोंदणी, नूतनीकरण आणि लाभ वाटपाचे अर्ज तसंच मूळ कागदपत्रं सादर करता येतील. त्यांच्या समस्यांचं निराकरण करण्यासाठीही हे केंद्र मदत करणार आहे. मंडळानं आतापर्यंत जिल्हास्तरावर ४२ कामगार सुविधा केंद्रं स्थापन केली आहेत. आता ३५८ तालुक्यांमधे ही कामगार सुविधा केंद्र सुरु होत आहेत.

<><><><><>

राज्यात महाविकास आघाडी मजबूत आहे, ती कुणीही हलवू शकत नाही, असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे. ते आज सांगली जिल्ह्यातील वांगी इथं माजी मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या 'लोकतीर्थ' या स्मारकाचं लोकार्पण आणि पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण समारंभात बोलत होते. राज्यातलं महायुती सरकार गुजरातच्या इशाऱ्यावर काम करत आहे, अशी टीका त्यांनी केली. मालवण राजकोट इथं सिवरायांचा पुतळा कोसळल्याच्या मुद्यावरुन त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावरही टीका केली. ज्येष्ठ नेते शरद पवार, काँगेसचे नेते राहुल गांधी, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, आणि इतर नेते यावेळी उपस्थित होते.

बँकांचे दरवाजे मोठ्या लोकांप्रमाणे शेतकरी, गरीब कष्टकरी आणि तरुणासाठीही उघडे केले पाहिजेत, असं राहुल गांधी यावेळी म्हणाले. वीस ते पंचवीस लोकांचं १६ लाख कोटी रुपये कर्ज माफ होत असेल तर गरिबांचं देखील १६ लाख कोटी रुपये माफ केले पाहिजेत, असंही ते म्हणाले.

डॉ. पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाच्या माध्यमातून राज्यातल्या अनेक भागात शिक्षण संस्था सुरु केल्या, त्याबरोबरच दुष्काळी भाग अशी ओळख

असलेल्या पलुस कडेगाव भागाचा कायापालटही केला, असं शरद पवार यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

राज्यातल्या विविध देवस्थानांच्या २७५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत आज मंजुरी देण्यात आली. श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंतीचं औचित्य साधून महानुभाव पंथाच्या रिद्धपूर, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, पांचाळेश्वर या देवस्थानांसह ग्रामीण भागातल्या ८ देवस्थानांच्या विकास आराखड्यांना मंजुरी देण्यात आली.

<><><><><>

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//